6

9719
क्र.जिपना/शिक्षण/प्राथ/मान्यता/का.क्र.२५/------/१८
कार्यालय जिल्हा परिषद नागपूर
शिक्षण विभाग (प्राथमिक)
दिनांक :- 26/10/2018

प्रति

अध्यक्ष/सचिव
महाराष्ट्र रिजनल बोर्ड ऑफ एज्युकेशन ऑफ दि चर्च ऑफ नार्थ इंडिया
नागपूर.

**विषयः- सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेला दर्जावाढ मान्यतेची परावनगी देण्याबाबत.**

संदर्भ:- १) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापन व विनियम) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र १, ६ व २४) २०१२ .

२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्र.एसएफएस-१०१७/प्र.क्र.९८८/ एसएम -२, दिनांक १० ऑगस्ट २०१८ .

३) मा.शिक्षण उपसंचालक नापगूर विभाग नागपूर यांचे पत्र क्रमांक प्राथ/ब/नवीन शाळा/८४४८/२०१८ , दिनांक ११ सप्टेंबर २०१८ .

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये नवीन शाळा स्थापन करणे / विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे करीता प्रस्ताव सादर केला होता. प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणे करीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे करीता खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात आलेली असून या कार्यालयमार्फत खालील नमुद शाळेला प्रथम खाते मान्यतेची परवानगी देण्यात येत आहे.

| अ क्र | जिल्हा | अर्जदाराचे संस्थेचे नांव व पत्ता | मान्यमा मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | शाळेचे प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ | शाळेचा प्रकार | मंडळ संलग्न | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागपूर | **महाराष्ट्र रिजनल बोर्ड ऑफ एज्युकेशन ऑफ दि चर्च ऑफ नार्थ इंडिया नागपूर.** | **बिशप कॉटन स्कूल (सी.बी.एस.ई.), सदर,नागपूर** | इंग्रजी | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८ वी) | सी.बी.एस.ई | सन २०१८-१९ पासून |

Secretary
M.R.B.E. of CNI

HEAD MISTRESS
BISHOP COTTON SCHOOL CBSE
& Sr. SECONDARY
NAGPUR

**अटी व शर्ती**

१) संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

२) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवनगी दिलेली आहे. त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) या अधिनियमातील तरतूदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून असेल.

४) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे. त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

५) परवानी मिळल्यापासून अठरा महिन्याचा आत व्यवसास्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवनगी रद्दबातल ठरले.

६) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

७) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करता **स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावरील परवानगी पत्र नवीन शाळा/वर्ग** असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील व वेळोवेळी करण्यात येणा-या पत्रव्यवहारावर स्वंय अर्थसहाय्यीत शाळा/वर्ग असे लिहिणे बंधनकारक राहील.

८) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांची भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९) महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियम या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना यू-डायस मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यीत शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

१०) विहित निकषाची व विहित मुदतीची मुदतठेवीची वाढीव मुदतीची प्रत तसेच ४० आर क्षेत्रफळाएवढा नोदणीकृत भाडेकराराची प्रत मा.शिक्षण उपसंचालक,नागपूर या कार्यालयात ३ महिन्याच्या आत सादर करावी.

शासनाने सध्या अस्तिवात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

(सी.जी.वंजारी)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद नागपूर

**प्रतिलीपी**

१) मा.अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुबंई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) मा.शिक्षण संचालक (प्राथ) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे १ यांना माहितीस्तव सविनय सादर.

३) मा.शिक्षण उपसंचालक,नागपूर विभाग ,नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.

४) मुख्याध्यापक, **बिशप कॉटन स्कूल (सी.बी.एस.ई.), सदर,नागपूर** यांना माहितीस्तव

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद नागपूर

HEAD MISTRESS
BISHOP COTTON SCHOOL CBSE
& Sr. SECONDARY
NAGPUR

Secretary
M.R.B.E. of CNI

जा.क्र. प्राथ/ब/नवीन शाळा/ ८४८ /२०१८
कार्यालय शिक्षण उपसंचालक
नागपूर विभाग, नागपूर
दिनांक - 11 SEP 2018

प्रति,

**महाराष्ट्र रिजनल बोर्ड ऑफ एज्युकेशन ऑफ दि चर्च ऑफ नॉर्थ इंडिया**
**सदर नागपूर**

विषय :- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :-१) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.
२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्र. एसएफएस-१०१८/प्र.क्र. ९५७/एसएम-२ दिनांक १४ ऑगस्ट २०१८

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता प्रस्ताव सादर केला होता. प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. ०२ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरीता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| अ. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव व पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता | नविन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | शाळेचे माध्यम | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नागपूर | महाराष्ट्र रिजनल बोर्ड ऑफ एज्युकेशन ऑफ दि चर्च ऑफ नॉर्थ इंडिया | **बिशप कॉटन स्कूल (सीबीएसई) सदर नागपूर** | नविन शाळा | राज्यमंडळ | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी) सीबीएसई | इंग्रजी | सन २०१८ - २०१९ पासून |

अटी व शर्ती

१. सदर संस्थेने विहित निकषाची व विहित मुदतीची मुदतठेवीची वाढीव मुदतीची प्रत, तसेच ४० आर क्षेत्रफळाएवढा नोंदणीकृत भाडेकराराची प्रत या कार्यालयाकडे तीन महिन्याच्या आत सादर करावी
२. सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.
३. संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने **अधिनियम, २००९** मधील तुरतुदींची पुर्तता करुन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत

HEAD MISTRESS
BISHOP COTTON SCHOOL CBSE
& Sr. SECONDARY
NAGPUR

Secretary
M.R.B.E. of CNI

शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल ठरेल.**

**क) शासन निर्णय दि. २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार सी.बी.एस.ई.मंडळाशी संलग्नते करिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.**

४. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i )शासनाच्या वेळोवळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii)शासनाच्या महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम , २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील.

५. संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

६. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

७. **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नविन शाळा/दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, **"स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा"** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे , संस्थेने, सर्व संबधितांच्या माहितीकरीता **"स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

८. परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये **शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती** शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल, अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

(सतीश मेंढे)
शिक्षण उपसंचालक
नागपूर विभाग, नागपूर

प्रतिलिपी-

१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. आयुक्त (शिक्षण) आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ) महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१ यांना माहितीस्तव सविनय सादर
५. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद **नागपूर** यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित. सदर संस्था बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पूर्तता करते किंवा कसे? याची तपासणी करून शासनाने दिलेला दर्जावाढीचा मुळ स्वाक्षरीचा आदेशाची खात्री करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
६. मुख्याध्यापक **बिशप कॉटन स्कूल (सीबीएसई) सदर नागपूर** यांना माहितीस्तव अग्रेषित.

HEAD MISTRESS
BISHOP COTTON SCHOOL CBSE
& Sr. SECONDARY
NAGPUR

Secretary
M.R.B.E. of CNI

ग्राम : नागपूर शहर
दुरध्वनी :- 0712-2560902
ई मेल :- ssanagpur1@yahoo.co.in

जावक क्र: जिपना/शिवि/प्राथ./RTE/शा.मा./2214/2022
कार्यालय, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर
विभाग - नागपूर, राज्य - महाराष्ट्र.
दिनांक : 17/03/2022

प्रति,

अध्यक्ष,सचिव,
महाराष्ट्र रिजनल बोर्ड ऑफ एज्युकेशन,चर्च ऑफ नार्थ इंडीया, नागपूर

**विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम 2011 मधील पोट-नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये आपल्या दिनांक 09.03.2022 च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार/शाळेची केलेली तपासणी या आधारे मी रवींद्र काटोलकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नागपूर, दिनांक 01.04.2022 ते 31.03.2025 पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता 1 ते 8 करीता बिशॉप कॉटन स्कुल,(सी.बी.एस.ई.इंग्रजी),सदर, नागपूर या शाळेस तात्पुरते मान्यता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे.

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
2. बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 ( जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, 2011 ( जोडपत्र दोन ) मधील तरतुदींचे शाळा पालन करील.
3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25 % मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणाकाचे अनुपालन करण्यात येईल.
4. परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम 12 (2) नुसार प्रतिपुर्ती मिळेल. अशी प्रतिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
5. संस्था / शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही. आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकांना भाग पाडणार नाही.
6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
7.(एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तिन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम 23 (1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाया शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24 (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची /तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील, आणि

(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

8. शाळा समचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन,

Secretary

- एकूण बांधकाम क्षेत्र -.                21429 चौ.फुट
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ -.          21300 चौ.फुट
- वर्गखोल्यांची संख्या —    21
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकांची खोली -     आहे.
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे- जेथे वापरण्यासाठी व प्रसाधान गृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. - आहे.
- पिण्याच्या पाण्याची सुविधा -    नळ व शुध्द पाणी सोय आहे.
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाक घर-    लागू नाही.
- अध्यापन-अध्यापन साहित्य/ खेळ व क्रीडा विषयक सामुग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता -   आहे.
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध —     पुस्तके उपलब्ध आहेत.
- सर्व सुविधा विना अडथळा उपलब्ध आहेत काय?-  आहे.
- शाळेला संरक्षण भिंत आहे काय?-  आहे.

11. मान्यता नसलेल्या वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

12. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

13. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

14. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा कोणत्याही नफा मिळविण्याकरीता चालविण्यात येत नाही.

15. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरण पत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-याकडे पाठविण्यात यावी.

16. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक 27091404312 असा आहे,हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

17. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तींची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

18. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही नुतनीकरण असल्यास नुतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

19. शासनाचे ध्येयधोरणानुसार शाळेतील कार्यरत मुख्याध्यापक तसेच शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची वैयक्तीक मान्यता शिक्षण विभागाकडून घेणे आवश्यक राहील.

20. बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 प्रमाणे शाळेला आवश्यक असणा-या उपरोक्त त्रुटींची पुर्तता दिनांक 31.03.2025 पर्यंत पूर्ण करण्यात याव्यात. ***अन्यथा आपल्या शाळेची मान्यता त्यापुढे आपोआप संपुष्टात येईल.***

सही—
(रवींद्र काटोलकर)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,नागपूर

**प्रतिलिपी :**

मुख्याध्यापक,बिशॉप कॉटन स्कुल,(सी.बी.एस.ई.इंग्रजी),सदर,नागपूर यांना माहितीस अग्रेषीत.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

Secretary
M.R.B.E. of CNI

...MISTRESS
...COTTON SCHOOL CBSE
& Sr. SECONDARY